0 6 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकासासाठी युवा महोत्सव महत्त्वाचा

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठाच्या 'युवा महोत्सव २०-२१'चे पारितोषिक वितरण

कोल्हापूर, ता. ५ : "विद्यार्थ्यांत विविध कलागुणांबरोबरच कौशल्ये विकसित करण्यात युवा महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावतात," असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे ऑनलाईन घेतलेल्या ४० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे पारितोषिक वितरण झाले. विवेकानंद महाविद्यालयाने युवा महोत्सव २०२०-२०२१ चे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. या संघास माजी कुलगुरू आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक आणि प्रशस्तीपत्रे देऊन गौरविले.



**कोल्हापूर : ४० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना विवेकानंद महाविद्यालयाचा संघ.**

विद्यार्थी विकास विभागाने जिल्हास्तरीय तसेच मध्यवर्ती युवा महोत्सव ऑनलाईन स्वरुपात आयोजित केले होते.

प्राचार्य डॉ. एल. जी. जाधव, मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक डॉ. नीलेश सावे, विवेकानंद महाविद्यालयाचे संघ व्यवस्थापक डॉ. अरित महात, स्वरदा फडणीस यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. गुरव यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी आभार मानले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव विभागवार विजेतेपदाचा फिरता चषक. **वाङ्मय प्रकार** : इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांना विभागून. **संगीत प्रकार** : देशभक्त रत्नाप्पा कॉलेज ऑफ कॉमर्स. **नृत्य प्रकार** : श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली. **कला प्रकार** : मुधोजी कॉलेज, फलटण. **नाट्य प्रकार** : ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांना विभागून.

0 6 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देवराई संवर्धनातून पडसाळीचा विकास

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर; जुगाईदेवी देवराई संवर्धन व अभ्यास प्रकल्पाचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

राधानगरी, ता. ५ : देवराई संवर्धनातून पर्यावणाचे संवर्धन होणार आहे. तसेच येथे पर्यटनही विकसित होईल. फळ प्रक्रिया उद्योग, मधुमक्षिका पालन यासाठीही देवराई सहाय्यभूत ठरणार आहे. त्यामुळेच देवराईमुळे पडसाळीचा शाश्वत विकास होणार आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. पडसाळी (ता. राधानगरी) येथील जुगाईदेवी देवराई संवर्धन व अभ्यास प्रकल्पाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

भोगावती सांस्कृतिक मंडळ, कसबा तारळे व वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे जुगाईदेवी देवराई अभ्यास



कोल्हापूर : पडसाळी (ता. राधानगरी) येथील देवराई संवर्धन प्रकल्प उद्‌घाटन कार्यक्रमात बोलताना डॉ. विलास नांदवडेकर. सोबत मान्यवर.

व संवर्धन प्रकल्प' राबवण्यात येणार आहे. सुरवातीला भोगावती सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून पडसाळीत. मागील दोन वर्षांत जलसंधारण व देवराई टिकवण्यासाठी केलेल्या विविध उपक्रमांची माहिती काका आठवले विद्यार्थी वसतिगृहाचे व्यवस्थापक श्रीकांत वष्ट यांनी दिली. यानंतर कुलसचिवांनी देवराईला भेट दिली. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रकल्पाची माहिती दिली.

ते म्हणाले, 'वर्षभरातील देवराईच्या जैवविविधतेत होणाऱ्या बदलाची तसेच पक्षी, प्राणी, सूक्ष्मजीव यांची नोंद करण्यात येणार आहे व त्यानंतर येथील दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.'

डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'देवराईचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. कारण यामुळे केवळ पर्यावरणाचे संवर्धन होणार असे नाही, तर गावाच्या विकासासाठीही ते आवश्यक आहे. पडसाळीचे सरपंच तानाजी पाटील, उपसरपंच गणपती पाटील, ग्रामसेवक विकास पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष मारूती पाटील, सचिव पांडुरंग भोसले, गुरुनाथ कुलकर्णी, प्रा. डॉ. घनश्याम दीक्षित, आशुतोष फडणीस, एन. एम. पाटील आदी उपस्थित होते.

0 6 OCT 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**२ ऑक्टोबरला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी केली तर कालच ५ ऑक्टोबर हा 'जागतिक शिक्षक दिवस' म्हणून साजरा केला. या निमित्ताने पाहता शिक्षकांनी दिलेली विशेष सेवा, त्यांचे शिक्षणातील योगदान, त्यांचे विद्यार्थी व समाज यांच्या विकासातील भूमिका व महत्व यांना जागतिक स्तरावर स्वीकृती दिली जाते. जगातील १०० हून अधिक देश ५ ऑक्टोबर हा जागतिक शिक्षक दिवस म्हणून साजरा करतात. या दिवशी शिक्षकांना आदरांजली वाहणे, शिक्षक व्यवसायातील समस्या कशा कमी होतील व तरुण पिढी या व्यवसायाकडे कशी आकर्षित होईल यासाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी यूनेस्को, एज्यूकेशनल इंटरनॅशनल, युनिसेफ, यूनडीपी, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यांसारख्या संस्था, संघटना प्रोत्साहन देतात.**



# ५ ऑक्टोबर 'जागतिक शिक्षक दिन'

आपण २५ ऑक्टोबर १९६६ या दिवशी यूनेस्को आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यांनी पॅरिस येथे आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेत जागतिक स्तरावर शिक्षकांच्या स्थितीचा विचार प्रथमच करण्यात आला. परिषदेने शिक्षकांचे अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या अशा शिक्षक व्यवसायाशी संबंधित पैलूंवर शिफारशी केल्या. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ध्येयनिष्ठ व प्रेरित शिक्षकांची देशांना किती गरज आहे हे लक्षात आले म्हणूनच यूनेस्कोने १९९४ पासून ५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक शिक्षक दिवस म्हणून साजरा करावा असे आवाहन केले आहे.

११ नोव्हेंबर १९९७ पासून यूनेस्कोने पूर्वीच्या शिफारशींबरोबर उच्च शिक्षण स्तरावरील शिक्षकांचे अध्यापन, त्यांचे संशोधन यांचा देखिल समावेश केला. यूनेस्को दरवर्षी ५ ऑक्टोबर या जागतिक




शिक्षक दिनानिमित्त एक विषय देते. यूनेस्कोने दिलेल्या या विषयाशी संबंधित परिसंवाद, परिषद, यांसारखे विविध उपक्रम जगभर राबविले जातात. यंदाच्या म्हणजे सन २०२१ च्या जागतिक शिक्षक दिनासाठी यूनेस्कोने दिलेला विषय Teachers at the Heart of Education Recovery अर्थात शिक्षणाच्या पुनरनिर्मितीमध्ये शिक्षक केंद्रस्थानी आहेत असा आहे. हा विषय शिक्षकांनी कोविड- १९ महामारीच्या काळात केलेल्या कामगिरीला दिलेली पोचपावतीच आहे असे म्हणता येईल.

महात्मा गांधी शाळा, महाविद्यालये यांना ज्ञान मंदिरे म्हणत. शिक्षणातील चांगल्या, वाईट बाबींचे उत्तरदायित्व शिक्षकांकडेच येते असेही मानत. येथे गांधींचे विचार मांडण्याचा उद्देश म्हणजे सन २०२० व २०२१ या दोन्ही वर्षांमध्ये कोविड- १९ महामारीमुळे जवळजवळ १५० देशांमध्ये कमी अधिक कालावधीसाठी लॉकडाउन होता. परंतु शिक्षकांनी मात्र व्हर्च्युअल राहून मोबाइल, लॅपटॉप, संगणकाचा आधार घेत विविध समाज माध्यमाद्वारे अध्यापन सुरू ठेवले. आपले व्यवसायाप्रति उत्तरदायित्व सिद्ध केले.

शाळा, महाविद्यालये आता टप्याटप्याने सुरू होत आहेत. समाज, पालक, विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन पुन्हा एकदा पाहिल्यासारखी शिक्षण व्यवस्था सुरू करावयाची आहे. हे आव्हान शिक्षकांनाच पेलवायचे आहे. त्याचप्रमाणे शिक्षणाची विस्कटलेली घडी परत एकदा सावरावयाची आहे. म्हणूनच यूनेस्कोने २०२१ या वर्षामध्ये दिलेला विषय Teachers at the Heart of Education Recovery समर्पक आहे असे म्हणत येईल.

**डॉ. प्रतिभा सू. पाटणकर**
**शिक्षणशास्त्र विभाग,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

पुढारी

# पदव्युत्तर प्रथम वर्ष, पुनर्परीक्षा सुरळीत सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रथम वर्ष व पुनर्परीक्षाअंतर्गत मंगळवारी एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.एस.डब्ल्यू., एमसीए व बी.ए., बी.कॉम., एम.ए.,एम. कॉम. अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या. १,७५५ पैकी १,६०६ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, मंगळवारपर्यंत ३७१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.